मन्या रानडे

अमेरिकेतला सहा महिन्यांचा मोठा मुक्काम जवळ जवळ संपत आला होता. मुलांच्यातल्या अलिखित कराराप्रमाणं आता पुढचे सहा महिने 'इंडिया'तल्या मुलाकडं म्हणजे पुण्यात जाऊन रहायचं होतं. बाहेर चक्क उन पडलं होतं. सकाळचं पाच मैलांचं पायी फिरणं आटोपून परत आलो. मुलाच्या घरातल्या शिस्तीप्रमाणं सर्वांचा हसत खेळत ब्रेकफास्ट झाला. एकमेकांची खुशाली व दिनक्रम विचारून जो तो आपापल्या कामाला निघून गेला. मी माझ्या खोलीत आलो. सवयीप्रमाणे लॅपटॉप उघडला. छोटया संजू विजूला मांडीवर घेऊन बसलेली प्रसन्नवदना सुमा स्क्रीनवर उमटली. हा फोटो बघितला की मुलं कशी पटदिशी मोठी झाली त्याचा चित्रपटच मनात उलगडतो. सुमाला जाऊनही आता पाच वर्षं झाली. पण ही रोजची भेट ठरलेलीच. फोटो तोच पण मूडप्रमाणे रोज काहीतरी नवंच जाणवतं पाहताना.

सवयीपमाणे मेल चेक करून झाल्या. जंक कचरा डिलीट करून पण झाला. डोंगरे व प्रधान हयांनी पाठविलेल्या रंजक, उदबोधक व माहितीपूर्ण मेल बघून झाल्या. त्यातलं उपयोगाचं मटेरियल डाउनलोड पण करून घेतलं. 'प्रौढत्वी निज शैशवा'ची जपणूक करत असलेल्या

हया समवयस्क मित्रांचा निरोप घेऊन ‘चेहेरा पुस्तका’ कडं मोहरा वळवला. तिथं नेहमीची मंडळी ई-चावडीवरती जमलेली होतीच. त्यांच्याकडं वळण्यापूर्वी पहिलं काम म्हणजे नवीन आमंत्रणं स्वीकारणं. कुणी का असेना. कुणालाही नाराज करायचं नाही. मग तो वा ती कुठच्याही देशातली किंवा सामाजिक जाळयातली (सोशल नेटवर्क) असेना का. त्यातल्याच एका पुतणीनं चॅट रूमवर लिहायला सुरूवात केली.

‘काका. लिंकेडइन वर मी तुमची प्रोफाईल पाहिली. तुमच्याकडे जुन्या दुर्मिळ गाण्यांचा प्रचंड साठा आहे ना? मग एक विचारू? जयपूर अत्रौली घराण्याच्या उस्ताद अलादिया खानसाहेबांचं काही ध्वनिमुद्रण आहे काय तुमच्याकडे?’

प्रत्यक्ष न पाहिलेल्या पुतणीची ही विचारणा अनपेक्षित व चकित करून सोडणारी. त्यामुळं तिला आणखी विचारलं तर म्हणाली,

‘अहो मी केसरबाई केरकर व मोगूबाई कुर्डीकरांचं ध्वनिमुद्रित गाणं खूप ऐकते आहे सध्या. त्यांचे गुरू कसे गात होते ते जाणून घ्यायची आम्हा दोघांची खूप इच्छा आहे’.

‘दोघांची? म्हणजे कोणाकोणाची?’

‘म्हणजे माझी व नेटवरच्या रानडेकाकांची. त्यांना मी कधी भेटले नाहीए पण त्यांनी गाणं कसं ऐकावं ते मला शिकवलं. खूप लिंक्स

पाठवल्या. नेटवर अलादियाखान साहेबांचं गाणं सापडत नाही. म्हणून आम्ही शोधत होतो तर तुमची माहिती मिळाली. तुम्हाला त्यांना फेसबुकवर भेटायला आवडेल काय? ते पण पुणेकरच आहेत व सवाई गंधर्व महोत्सवाचे जुने वारकरी आहेत'.

'हो. हो. अवश्य पाठव निमंत्रण. पूर्ण नाव काय म्हणालीस त्यांचं?' मी विचारलं.

'प्रो. एम. जी. रानडे. गणिताचे प्रोफेसर आहेत म्हणे. अमेरिकेमध्ये बर्कलेला असतात. पण फार बेभरवशाचे. त्यांच्या फेसबुक प्रोफाईल वर फोटो नाही. कधी दिवसातून खूप वेळ गप्पा मारतात तर कधी दिवसचे दिवस गायब असतात. महिनाभर सुद्धा. अन हो. वीक एण्ड अन सार्वजनिक सुटटीला कधीच सापडत नाहीत. पण किती वेगवेगळया विषयात गती आहे त्यांना. साहित्य, संगीत, जागतिक राजकारण, भारतीय तत्वज्ञान. भगवदगीता व ज्ञानेश्वरी पाठच आहे त्यांची. मी अजून भेटली नाहीए त्यांना पण मला तर ते अगदी महादेव गोविंद रानडेच वाटतात'.

पुतणीची माहिती वाचत असताना विचारचक्र सुरू झालं. त्याच वेळी इतर मित्रांशी पण चॅटिंग चालूच होतं. अकरा वाजता नेटवरची सगळी वर्तमानपत्रं चाळली. यू टयूबवरून 'उंच माझा झोका' चा काल इंडियात दाखवून झालेला एपिसोड बघितला. न्यायमूर्ती महादेव

गोविंद रानडे हयांच्या मृत्यूचा प्रसंग डोळयात पाणी उभं करणारा होता. मग जेवायची वेळ झाली. एकटयानंच. ओव्हनमध्ये अन्न गरम करून घेतलं. दुपारी जरा वामकुक्षी झाली. मनात पुतणीचा मेल घोळत होताच. कोण असतील बरं तिचे पुण्यातले काका? अन एकदम आठवलं. वीजच चमकली जणुं. शाळा कॉलेजमधला आपला दोस्त 'मन्या रानडे' तर नसेल हा? चॅटवर पुतणीनं लिहिलेलं वर्णन तर बरंचसं मिळतं जुळतंच होतं. तीसहून अधिक वर्षे झाली की त्याला शेवटचं भेटून. अमेरिकेला गेला तो गायबच एकदम. अगदी कुणाच्याच संपर्कात राहिला नाही. सायंकाळी बागेत फिरायला जाईतो त्याचाच विचार डोक्यात व मनात घोळत होता. कितीतरी खूप जुन्या आठवणी हळूहळू मनात जाग्या व्हायला लागल्या.

मन्या रानडे अकरावीला आमच्या वर्गात आला. त्याचे वडिल लहानपणीच वारलेले. पण त्यांची गणिताची पुस्तकं फार गाजलेली होती. शाळांमध्ये क्रमिक पुस्तकं म्हणून अनेक वर्षे वापरात होती. वडिलांमागं आईनं त्याचं उत्तम संगोपन केलं होतं. जुन्या मराठी नाटकातनं कामं वगैरे करायची म्हणे ती. मन्या एकुलता एक. लाडका लेक. भारी व्रात्य अन हूड. त्याच्या अनेक हकीकती ऐकिवात होत्या. मोडक्या छत्रीच्या काडयांचा धनुष्यबाण करून घरातच नेमबाजी करायचा. दिवसाढवळया वाडयातल्या घराघरांमधून उंदीर फिरायचे. हा त्या मूषकांना अचूक टिपायचा. पोटात बाण घुसलेला

उंदीर धारातीर्थी पडताच बाणाच्या मोकळया टोकानं त्याला उचलून गटाराच्या पाण्यात बुडवून जलसमाधी. कधी मनीमाऊ पण आयत्या उंदरावर मजेत ताव मारायची. त्यामुळं वाडयात त्याची वट असायची. अचरटाचार्य तर नंबर एक. आपल्या शरीराच्या सर्व शक्यता आपण आजमावून पहात नाही ही त्याची कायमची तक्रार असायची. मग स्वतःपासूनच अनोख्या व अघोरी प्रयोगांना सुरूवात. अन्नपाण्यावाचून किती वेळ राहू शकतो ते एका मिनिटात किती कप चहा पिऊ शकतो किंवा एका मिनिटात किती इडल्या हाणू शकतो इथपर्यंत काहीही. कॉलेजच्या हीरक महोत्सव समारंभाच्या जेवणात पठठयानं साठ जिलेब्या फस्त केल्या व पोट जड झालं म्हणून पर्वती तीन वेळा चढून उतरून आला. एका पावसाळयात तर जिवंत बेडकाला हातात घटट धरून दातांनी कचकन त्याच्या पोटाचा लचका तोडला होतान. भीती अन किळस गेली पाहिजे म्हणून. हे सगळे अचाट उद्योग चालू असताना शिक्षण व्यवथित चालू होतं. अभ्यासात हुशार. विशेषतः गणितात गती चांगली. पण वर्गात पहिलं यावं, बोर्डात चमकावं असल्या क्षुद्र कल्पना हयाच्या मनास कधीच शिवल्या नाहीत. हयाचा पुढच्या वर्गाचा अभ्यास पण तयार असायचा. संकल्पना महत्वाच्या. घोकंपटटी नाही हा त्याचा आग्रह असायचा. कुठच्याही परिक्षेला तीन तास बसायचं ही शिक्षा वाटायची. नियमाप्रमाणे अर्धा तास बसायचा. तेवढयात पास

होण्यापुरते प्रश्ण सोडवायचा व सरळ पेपर टाकून कॅरम किंवा टेबल टेनिस खेळायला किंवा रेकॉर्ड लायब्ररीत आलेली नवीन गाणी ऐकायला निघून जायचा. ‘करायचेत काय आपल्याला ज्यास्ती मार्क?’ ही हयाची भूमिका. अर्थात तेव्हां काळ ही अनुकूल होता. कितीही कमी मार्क असले तरी कुठेपण प्रवेश सहज मिळायचा.

महाविद्यालयीन काळात आईनं मोटरसायकल घेऊन दिलेली. गडी धिप्पाड व थोराड. त्यामुळं एकदम रूबाबात. पोलिस इन्स्पेक्टरच वाटायचा अगदी. एकदा मित्रांबरोबर राहुल टॉकीजला सिनेमाला गेलेला. शो हाउसफुल्ल. बाहेर तिकिटांचा काळाबाजार चाललेला. हा मोटरसायकलवरून बिनधास्त त्यांच्यात घुसला. स्पेशलवाल्याच्या थाटात. दोन पोरांच्या कानाखाली सणसणीत आवाज काढून हवी तितकी तिकिटं घेऊन व योग्य तेवढे पैसे देऊन आला पण. पिक्चर संपेतो आम्हा सर्वांचीच तंतरली होती. हा एकदम मजेत. शो झाल्यावर हा आवारात मस्तपैकी चार मिनार फुंकत उभा. एकावेळी पानाच्या ठेल्यावर असतील त्या सगळया ब्रँडसचं एकेक अख्खं पाकिट घ्यायचा. पाची बोटात अंगठया घालाव्यात तश्या वेगवेगळया सिगारेटस धरून धुराचं कॉकटेल फुंकायचा. माझ्याकडं गाणी ऐकायला यायचा. खूप ऐकायचा. संगीतावरची जुनी नवी पुस्तकं वाचायचा. गाण्यावर चर्चा करायचा. पं. भीमसेन जोशी म्हणजे त्याचं दैवतच. पुण्यात असेतो सवाई गंधर्व महोत्सवाच्या तीन दिवसात

हयाचा मुक्काम मंडपातच.पडेल ते काम करायचा.'जो भजे हरीको सदा' हे भीमसेनजींच्या आवाजातलं भैरवीतलं भजन पुन्हा पुन्हा ऐकायचा.का कोण जाणे पण पोरीबाळींपासून मात्र अंमळ दूरच असायचा.तसा तो स्त्री द्वेष्टा नव्हता.आम्ही चिडवायचो पण तो मात्र गप्पच रहायचा.

एम.एस्सी.झाल्यावर मुंबईच्या विख्यात मूलभूत संशोधन संस्थेत गणितात पी.एच.डी.चा अभ्यास करायला निघून गेला.जाताना मन्यानं माझ्याकडून पंडितजींच्या आवाजातलं त्याचं ते आवडतं भजन साठ मिनिटांच्या टेपवर करून बरोबर नेलं.त्याच्या मागणीप्रमाणं संपूर्ण टेपवर तेच एक गाणं पुन्हा पुन्हा मुद्रित केलं होतं.इंटर सायन्स पर्यंत शिकून आम्ही केव्हाच कारकुनीला लागलो होतो.पण ओळख व मैत्री टिकून होती.माझ्या लग्नाला पण अक्षता टाकून पसार झाला.जेवायला थांबत नाही, उद्या गाणी ऐकायला येतो असं बायकोला सांगून निघून गेला.अधूनमधून सवाई गंधर्व महोत्सवासाठी परदेशी मित्रांना घेऊन्न मुंबईहून मुद्दाम यायचा.हळूहळू तेही कमी झालं.कुणाकडून काहीबाही कानावर यायचं.मन्या आता पार बदललाय.दारू सिगारेट तर बंदच.उलट अध्यात्माच्या मार्गावर दमदार वाटचाल चालू आहे.ज्ञानेश्वरी व भगवदगीतेचा अभ्यास चालू आहे.हॉस्टेलवर गुरूचरित्र वाचनाचा सप्ताह साग्रसंगीत झाला.त्याला सहाध्यायी आता 'गुरूदेव रानडे' म्हणू लागले आहेत.त्यानं न

पाळलेल्या पोपटाची एक गोष्ट पण पुण्यातल्या टोळक्यात फार लोकप्रिय झाली होती. मन्याने म्हणे एक पोपट पाळला व त्याला चांगला पढवला. त्याच्या दोन्ही पायांना धागे बांधले. डाव्या पायाचा धागा ओढला की पोपट भगवदगीतेचं पठण सुरू करी. उजव्या पायाचा धागा ओढला की ज्ञानेश्वरी. असा त्याचा पोपट पण अगदी संतपदाला पोचलेला. 'अधिकस्य अधिकं फलम' ह्या उक्तीचा अनुभव घेण्याकरिता एकदा मन्यानं दोन्ही धागे एकदमच ओढले. त्या बरोबर पोपट ओरडला,'मन्या ××व्या, पडतोय ना मी ×××च्या'. अशी टिंगलटवाळी चालू असली तरी मन्याची आठवण दोस्तांना हटकून यायचीच. पुढं गाईडशी काही वाद झाल्यानं व पडतं घेण्याचा त्याचा स्वभावच नसल्यानं त्यानं पुरं होत आलेलं काम सोडून दिलं व तडक अमेरिकेतल्या नामवंत विद्यापीठात प्रवेश मिळवला. मायदेशाला रामराम ठोकला तो कायमचाच. कुणाशी म्हणून कसलाच संबंध ठेवायचा नाही हे त्यानं कसोशीनं पाळलं. अगदी आई वारली व त्याला कळवलं तरी आला नाही. जवळच्या आप्तांनीच तिची उत्तरक्रिया उरकली.

तीस वर्षे होऊन गेली. काळाच्या विशाल पटटीवरचा अगदीच नगण्य कालखंड. पण पुतणीमुळं आज पुन्हा एकदा आठवणींचा पट उलगडला. त्यात इतका हरवून गेलो की मुलानं चार वेळा डिनरला हाक मारली तरी ऐकायलाच आलं नाही. शेवटी तो खोलीच्या दारात

येऊन उभा राहिला.जेवताना पण मी अगदी गप्प.शेवटी सुनेनं विचारलंच.मग मात्र सगळं सांगून मोकळा झालो.इतका जुना दोस्त इतक्या जवळ व त्याचा मागही इंटरनेटमुळं लागण्याची शक्यता आहे हे ऐकून सगळयांनाच नवल वाटलं.बरेच दिवस उलटून गेले व एक दिवस पुतणी पुन्हा फेसबुकवर प्रगटली.रानडेकाकांना तुमच्याविषयी कळवलंय म्हणाली.त्यांना पण काहीतरी आठवतंय.तुमच्याशी संपर्क साधतो म्हणालेत.तुमचा मेल आय.डी.पण कळवलाय त्यांना.मग रोजचा तो चाळाच होऊन बसला.सकाळ दुपार संध्याकाळ व रात्रीपण मेल बॉक्स उघडून बघायचा.आता परत निघायचा दिवस जवळ येऊ लागला.तशी आशा सोडून दिली.अन अचानक एक दिवस फेसबुकावर गुरूदेवच अवतरले.

चॅट रूमवर मेसेज झळकला,‘तू चांद्या काय रे? पुण्याचा?.तोच असशील तर इथं काय करतो आहेस लेका?.अन हो.तुझ्याकडे अलादिया खानचं व भास्करबुवा बखल्यांचं काही ध्वनिमुद्रण आहे काय रे?.सध्या मी दोघांच्यावर नेटवर पुष्कळ वाचतो आहे.शब्द फार पण गाण्याचा एक पण सूर नाही.दोघांचाही’.ही सरबत्ती वाचून खात्रीच पटली की हा मन्याच.

मग काय.पुढचा अर्धा तास दोघांचीही बोटं दुखेतो ई-गप्पा.फोन नंबरची देवाण घेवाण व मी इंडियात परत जायच्या आधी नक्की भेटायचा वायदा.कारण दोघात अंतर होतं ते एक तास मोटर

प्रवासाचं.अन तीच तर खरी अडचण.कारण मला मोटर चालवायचा कधी प्रश्णच आला नाही.तोही साठीला पोचलेला.मोटार आहे पण शक्यतो गावाबाहेर जात नाही म्हणाला.पत्ता मागितला तर तोही मोघम.इथं आल्यावर फोन कर म्हणाला.हे सगळं चॅटवरच.नेटवर त्याचा मोघम पत्ता टाकून बस किंवा रेलवेनं कसं जाता येईल ते शोधायचा पयत्न केला पण काही सुधरेना.मग शेवटी थोडी हिंमत करून मुलापाशी विषय काढलाच.मोघम पत्ता पाहून तो पण चक्रावलाच.

म्हणाला,'बाबा जरा जपून हं.तो भाग फार सुरक्षित नाही बरं.अन तुम्ही तर त्याच्याशी फक्त चॅटच केलंय.त्याचा फोटो पण फेसबुकच्या प्रोफाइलवर नाही म्हणता.एवढं महत्वाचं आहे का भेटणं? फोनवर पण बोलू शकता ना तुम्ही दोघं?'.

मुलाचं म्हणणं बरोबर होतं पण प्रत्यक्ष भेटणं हे नक्कीच आवडलं असतं.मग सर्वानुमते त्याच्याशी फोनवर बोलूनच काय ते करायचं असं ठरलं.सर्वांसमोरच फोन लावला व स्पीकर चालू ठेवून सगळेच ऐकू लागलो.बोलायचं फक्त मी एकटयानंच असं आधीच ठरलं होतं.मिनिटभरानंतर पलिकडून साद आली.

‘हां बोला चांदवणकर सुरेशराव.कसा आहेस रे मित्रा? माफ कर हं.जरासा रेस्ट रूम मध्ये होतो अन मोबाईल बाहेर ना.त्यामुळे फोन घ्यायला जरा उशीर झाला.बरं झालं कट नाही केलास’.

आर्जवी बोलणं व ओळखीचा आवाज ऐकून ‘हा मन्याच’ हयाची खात्रीच पटली.

‘मग केव्हा येतो आहेस ? मी सांगितलेली गाणी असतील तर बरोबर घेऊनच ये.गावात पोहोचलास की फोन कर.जिथं असशील तिथं घ्यायला येतो’.

मुलाची शंका काहीशी दूर झाली.दोन दिवसांनी भेटायचं ठरलं.तिकडचं काही काम काढतो.जाताना तुम्हाला सोडतो व तुमच्या गप्पा झाल्या की घ्यायला येतो असं मुलगा म्हणाला.एकटयानं जायला मला आवडलं असतं पण मुलाला व सुनेला फार काळजी ना.

दोनच दिवसांनी भल्या पहाटे मुलाबरोबर निघालो.गाडीतल्या जी.पी.एस.वरची बया गणितं करत (वुई आर कालकुलेटिंग) ‘टर्न लॅफ्ट, देन टर्न राईट,टेक हाय वे नंबर आय-टेन’ वगैरे सूचना देऊ लागली.गाडीतल्या ए.सी.च्या थंडगार हवेमुळं अंमळ डोळा लागला.ताडमाड उंच, नीटनेटके कपडे केलेला, केसांचा छान कोंबडा पाडलेला, घाऱ्या डोळयांचा, हसऱ्या चेहऱ्याचा, गोबऱ्या गालांचा व

सदा घाई गडबडीत असलेला मन्या रानडे नजरेसमोर दिसायला लागला.आता प्रोफेसर रानडे कसे दिसत असतील? मोठया आलिशान प्रासादात दोन सदाशिवपेठी पुणेरी कसे भेटतील हयाची चित्रं नजरेसमोरून जाऊ लागली.त्या सुखमय तंद्रीतून बाहेर आलो तो मुलानं चांगलं हलवून जागं केल्यावरच.गाडी बाजूला घेतली होती.म्हणाला,बाबा आता आपण जवळ आलो आहोत.करा फोन.फोनवर मन्याच बोलला त्याच्याशी.ॲव्हेन्यू रोड व बँक्रॉफ्ट रोडच्या क्रॉसिंगपाशी या.मी तिथं पोचतोच म्हणाला.गाडीतल्या जी.पी.एस.वरच्या बाईला ही माहिती पुरवली.तिनं पुन्हा गणितं करायला सुरूवात केली.मुलानं पन्नास डॉलर्स च्या नोटा व थोडी चिल्लर जवळ ठेवायला लावली व गाडी चालू केली.पाच मिनिटातच मन्यानं सांगितलेल्या जागी पोहोचलो.उजव्या बाजूला रस्त्याच्या कडेला सुरक्षित जागी गाडी उभी करून मुलानं मन्याला मिस कॉल करायला सांगितलं.गाडीची काच थोडी खाली करून फोन लावला.गाडीचा नंबर अगोदरच एस.एम.एस.केलेला होता.बाजूला चार पदरी रस्त्यावरून अफाट वेगानं मोटारी जात येत होत्या.माझं सगळं लक्ष समोरच्या आडव्या रस्त्यावर लागलेलं होतं.मिनिटभरात डावीकडच्या सिग्नल पोस्टपाशी एक वयस्कर व्यक्ती संथ पावलं टाकीत आली व खांबावरचं बटण दाबून वाहनं थांबण्याची वाट पहात शांतपणे उभी राहिली.नजर पलिकडं

रस्त्याच्या कडेला थांबलेल्या आमच्या गाडीला शोधीत होती असं वाटल्यानं मी खिडकीतून हाताचा फक्त पंजाच तेवढा काढून हलवला. तिकडूनही हात हलवून प्रतिसाद आला व सिग्नल मिळाल्यानं ती व्यक्ती रस्ता ओलांडू लागली. कमरेला खाकी हाफ पँट, वर अंगात सफेद टी शर्ट, पायात पांढरे स्पोर्टस शूज व डोईवर आईन्स्टाईन छाप पिंजारलेल्या केसांचा पिसारा. धीम्या गतीनं व संथ चालीनं खास थांबलेल्या गाडयांची जणुं सलामी घेत सम्राटाच्या थाटात रस्ता पार करून ती उंच चणीची मूर्ती आमच्या मोटारीच्या दिशेनं येऊ लागली. बारीक अंगकाठी, सुरकतलेला चेहरा, हाडं वर आलेली व खप्पड दोन्ही गाल. जवळ येताच मात्र ओळखीचं लाघवी स्मितहास्य व घारे डोळे हयामुळे ओळख पटली. त्याचंही असंच काहीसं झालं असावं.

'लेका चांद्या?'.

झटदिशी गाडीचं दार उघडून मन्या आत येऊन बसला.

'होय. चांद्याच. गुड मॉर्निंग प्रो. मनोहर गोविंद रानडे'.

'कसचा प्रोफेसर लेका. मी आपला मन्याच बरा आहे'.

मुलाची औपचारिक ओळख करून दिली. त्याला जायची घाई असल्यानं निरोप दिला. केव्हा घ्यायला येऊ विचारता मन्याच म्हणाला,

‘बापाची काळजी करू नको. आमच्या गप्पा झाल्या की मेट्रोत बसवून देतो व फोन करतो. तिकडे पोचल्यावर मात्र कुणीतरी घ्यायला या व पोचताच मला फोन करा’.

मुलानं पटल्यानं मान डोलावली. ओके म्हणाला व ‘काळजी घ्या’ असा इशारा डोळयांनीच देऊन निघून गेला.

‘आईबापाची फारच काळजी घेतात रे आजकालची पोरं. जणुं काही लहान बाळंच आपण त्यांची. बरं काय नाष्टा पाणी घ्यायचाय काय? तासभर तरी गेला ना मोटरच्या प्रवासात?’. मन्यानं विचारलं.

‘नको. मजबूत खाऊन पिऊनच आलोय. तीन चार तास तरी काही चिंता नाही. मात्र आधी रेस्ट रूम दाखव कुठं आहे ती. मग आपण मोकळे’.

‘चल. अगोदर विद्यापीठाचा परिसर फिरून दाखवतो तुला. हे सगळं गावच हया युनिव्हर्सिटीनं व्यापलेलं आहे. इथलं लॉ स्कूल एकदम टॉपला हं. सगळया जगातली मुलं जीव टाकतात प्रवेशाकरता इथं’.

त्या जगविख्यात विश्वविद्यालयाच्या विस्तीर्ण आवारात फिरताना आपण मुंबई विद्यापीठाच्या राजाबाई टॉवर परिसरात फिरतो आहोत की काय असंच वाटत होतं. पुष्कळ इमारती व आवारातली तरूणाई बघितली. कॅंटिन्समधनं चक्कर मारली व अब्राहम लिंकनच्या पुतळयापासच्या बाकडयावर टेकलो. कॅंटिनवरनं मन्याला एकदम पुणे

विद्यापीठातल्या पदार्थविज्ञान विभागासमोरच्या ‘अनिकेत’ संकुलाची आठवण आली. मग बिंडया भावे, गल्ल्यावरचा काशिनाथ, बाहेरच्या जरा उंचावरच्या दालनातली कॅरम व टेबल टेनिसच्या टूर्नामेंटस व अनेक मित्रांविषयी अतिशय तपशीलात जाऊन बोलायला लागला.

‘हा काय करतो, तो कुठं असतो, ती ब्यूटी क्वीन अजून तशीच आहे काय?’ वगैरे चवकश्या करून झाल्या.

मनानं दोघंही तीस पस्तीस वर्ष मागं जाउन तिथंच अडकलो होतो. मुंबईतल्या संस्थेविषयीच्या कडू गोड आठवणी व वास्तव्याच्या अनेक हकीकती त्याच्या तोंडून प्रथमच समजल्या. त्याची मला थोडीबहुत कल्पना होती. पण इथं आल्यापास्नं काय काय केलंन हया विषयी ज्यास्त उत्सुकता होती. पण त्याच्या कलानं घेणंच बरं असं वाटल्यानं गप्प राहून ऐकत राहिलो. कुणीतरी छान श्रोता मिळालाय व खूप दिवसांनी मराठीतनं बोलायला मिळतंय हयाचा त्याला खूपच आनंद झालेला दिसत होता. अर्धा मैल चालायची माझी तयारी आहे म्हटल्यावर मग मोठया उत्साहानं ‘इंटरनॅशनल स्टुडंटस सेंटर’ दाखवतो म्हणाला. वाटेत पुन्हा त्याला हव्या असलेल्या ध्वनिमुद्रणांविषयी चवकशी झालीच. ती अद्याप तरी उपलब्ध नाहीत असं समजल्यावरून खूप नाराज झाला. म्हणाला,

‘इथं सॅन फ्रान्सिस्कोला अली अकबर इन्स्टिटयूटमध्ये बरीच गायक वादक मंडळी येत असतात. त्यांनाही भेटून आलो. पण कानाच्या पाळया पकडून वर आकाशाकडं बघण्याशिवाय त्यांना काही येत नाही हे ध्यानात यायला लागलं. अरे, आपण गात आहोत त्या बंदिशींचे शब्द व त्यांचा अर्थ पण अनेकांना माहीत नाही व तेवढी तसदी पण घ्यायची इच्छा नाही. मग काय करणार. अलादियाखान साहेबां वरची पुस्तकं व लेख वाचायला सुरूवात केली. नेटवर काही विद्वानांशी चर्चा केली व त्यांचं गाणं कसं असलं पाहिजे हयाचा अदमास करायला लागलो’.

त्यानं केलेला अंदाज मग मला ऐकवायला लागला. केवळ शब्दांनीच नाही तर मोठमोठयानं ताना मारून व सरगम गाउन. काही पादचारी चमकून बघू लागले पण हया बाबाला त्याचं काही नाही. अलादिया खान हयांचं व बखलेबुवांचं गाणं कसंही करून शोधच म्हणाला. मग आजकालचं गाणं कसं फालतू व पाटया टाकू आहे हे एकवलंन. मी आपला निमूटपणे ऐकत भर माध्यान्ही त्याच्याबरोबर कडक उन्हातनं व बोडक्या डोक्यानं चालत राहिलो. दहा मिनिटांनी वळणावरच्या एका लांब रूंद चौथ-यावर बसलो. गळयातल्या बाटलीतलं घोटभर पाणी प्याला. मग त्यानंच विषय बदलला.

‘काय रे, नारायणराव बालगंधर्वांची किती गाणी तुझ्याकडे आहेत? पुण्यात असेतो मला त्या माणसाचं लाखेच्या रेकॉर्डवरचं तीन साडेतीन

मिनिटांचं गाणं अजिबात आवडत नसे.इथं येताना एका मित्रानं त्यांच्या गाण्याची कॅसेट माझ्या बॅगेत कोंबली.इतक्या वर्षात पाच मिनिटं सुद्धा मी ती ऐकू शकलो नाही.काय आहे काय त्या गाण्यात? पण एका मित्रानं त्यांच्या खाजगी कार्यक्रमातल्या गाण्यांची टेप पाठवली.त्यातलं 'नरवर कृष्णासमान' हे पद ऐकलं व माझे डोळे संपूर्णपणे उघडले.काय ताना? काय गाणं? किती उस्फूर्त.तुझ्या त्या तीन मिनिटांच्या तबकडीत काहीच उतरलेलं नाहीए रे.वाः.त्या तानांना जे वजन आहे ना ते कुठच्याही गवयाच्या कोणत्याही तानांना नाही.तुला सांगतानाही माझ्या अंगावर काटा आलाय बघ.अन मग माझ्या लक्षात आलं की अरे भास्करबुवांचं गाणं असंच असलं पाहिजे.अन मग मी बालगंधर्व ऐकायला लागलो.पण आता गाणी मिळत नाहीत.तू आता परत गेलास की मला सगळी गाणी सी.डी.वर पाठवून दे'.

हे गंधर्वपुराण चालू असताना मी मोबाईलच्या कॅमे-यातनं त्याची व्हिडियो घेत होतो पण त्याकडे त्याचं लक्षच नव्हतं.आपण काय काय गमावलं आहे हयाची हळहळच त्याच्या बोलण्यातून पाझरत होती.बोलता बोलता थोडासा चढणीचा रस्ता संपला व तिथल्या एका प्रशस्त इमारतीत आम्ही दोघं शिरलो.काही चिनी तरूण मुलं तिथं त्याची वाट पाहत थांबली होती.'इंटरनॅशनल स्टुडंटस सेंटर'च्या ऑफिसात मॅगी नावाच्या प्रौढ व्यवस्थापिकेशी औपचारिक ओळख

करून दिलीन व ‘आलोच हं पाच मिनिटांत एक काम आटोपून.तोवर तू बस इथं हिच्याशी बोलत’ म्हणाला व एवढं बोलून पळालाच.

‘ओह.आर यू ओल्ड स्कूलमेट ऑफ प्रो.रानाडी? व्हॉट अ वंडरफुल पर्सन अँड ए नाइस हयूमन बिइंग टू’.

हातातलं काम उरकून तिनं बाजूचा थर्मास उघडला व मी नको नको म्हणत असताना कॉफीचा मग माझ्या हाती दिलान.खरंतर मनातून मला कॉफी हवीच होती.माझ्या चेह-यावरचे भाव टिपून आपल्या कपातल्या कॉफीचे घुटके घेत घेत तीच म्हणाली,

‘डोंट वरी.ते काही दहा पंधरा मिनिटं तरी येत नाहीत आता.आठवडयातनं एकदा येतात व थोडा वेळ देशोदेशीच्या तरूणांशी संवाद साधतात.ती मुलं पण वाट पहात असतात त्यांच्या भेटीची.एवढा विद्वान माणूस पण किती साधा.थोडा चक्रमच आहे नाही? चहा कॉफी काही घेत नाहीत.अगदी कडकडून भूक लागली तरच काहीतरी हलकं खातो म्हणतात.लहानपणापास्नंच असे आहेत की काय’?

आता मन्याचे काय पराक्रम ऐकायला मिळतात हया उत्सुकतेनं मी म्हणालो, ‘हो.आहे थोडासा हटके खरा.पण काय झालं काय?’.

मग मॅगीनं मन्याचे पराक्रम सांगायला सुरूवात केली.

‘गेली आठ दहा वर्षे इथं राहतात. धूमकेतूप्रमाणं वेगवेगळया ठिकाणी अचानक प्रगटतात व गायब होतात. लहर असली तर ऐकणारा बोअर होईतो बोलत बसतात. तंद्रीत असले तर मात्र समोरून गेलं तरी ओळख दाखवायचे नाहीत. गती तर सगळया विषयात. तिकडे व्हर्जिनिया विद्यापीठात डॉक्टरेट व काही काळ प्रोफेसर होते म्हणे. काय बिनसलं तिकडे समजत नाही. आता इथं आहेत. परवा तर कमालच केली त्यांनी’.

‘अस्सं? काय बरं केलं त्यांनी?’ मी मोठया उत्सुकतेनं विचारलं.

म्हणाली, ‘गावातल्या सगळया बेघर म्हणजे होमलेस लोकांची त्यांनी इथल्या एका बागेत मिटिंग घेतली. त्यांच्यावरच्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी. इथली बरीचशी मंडळी आपल्या बरोबरचा बाडबिस्तरा घेऊन सार्वजनिक शौचालयं, ग्रंथालयं व उद्यानांमध्ये वावरत असतात. काही मंडळी अंमली पदार्थांच्या नशेत पण असतात. खूपच घाण करतात. त्यांच्याविरूद्ध अनेक तकारी आल्यानं इथल्या प्रशाननानं एक आदेश जाहीर केला. त्याप्रमाणं दोन फुटांपेक्षा जास्त लांबी रूंदीची वस्तू बरोबर घेऊन हया मंडळींना सार्वजनिक ठिकाणी वावरता येणार नाही. आता रानाडींचा सवाल असा की हे दोन फुटांचं माप कोणत्या निकषावर ठरवलंय व ‘पब्लिक प्लेस’ची अगोदर नीट व्याख्या करा. माझ्याशी परवा वाद घालत बसले होते. बेघर मंडळींना पण नीट समजावून सांगून निवेदन वगैरे तयार करतो आहे म्हणत

होते. बेघर असणं हा काही गुन्हा नाही. पण नीटनेटकं, निर्व्यसनी व स्वच्छ राहून अमेरिकन नागरिकत्वाचे हक्क आपण उपभोगू शकतो हे त्यांना पटतंय. काही ड्रग ॲडिक्ट व बेजबाबदार व्यसनी लोकांमुळं सगळेच जण भरडले जाताहेत'.

'अरे वा. चांगलंच समाजकार्य करताहेत म्हणायचं'.

'हो. आणखी त्यांचे "मॅक्झिमम बॉडी कपॅसिटी" चे पण प्रयोग चालू असतात. तिकडे पूर्व किना-यावर असताना दरवर्षी फुल मॅरेथॉन मध्ये धावणं, सगळीकडे बर्फाचे थर असताना त्यात अनवाणी व उघडया अंगानं चालणं असले उद्योग करत. त्याला काय हठयोग की काय म्हणतात ना इंडियामध्ये. तिथल्या पेपर व टी. व्ही. चॅनेलमध्ये 'ग्रेट इंडियन आइसमन' म्हणून बरीच प्रसिद्धी पण मिळाली होती. एका खूप जुन्या वर्तमानपत्रातली कात्रणं दाखवली होती त्यांनी मला एकदा'.

हे सगळं ऐकत असताना मला पुण्यातला मन्या सारखा डोळयांपुढं येत होता. साठी जवळ आली तरी अजूनही सुंभ आणी पीळ दोन्ही शाबूत आहेत तर. शाब्बास. भले बहाद्दर.

कॉफीचा आणखी एक राऊंड व गप्पा होईतो मन्या आलाच. मग मॅगीचे औपचारिक आभार मानून व बाहेर लॉनमध्ये बसायची परवानगी घेऊन दोघं निघालो. आता आभाळ भरून आलं होतं व वाराही सुटला होता. त्यामुळं जरा आडोशाला जाऊन निवांत बसलो.

मीच सुरूवात केली.‘ही चीनी मुलांशी कसली बातचीत करून आलास?’

‘काही नाही रे.ही विशी पंचविशीची हुषार मुलं येतात इथं शिकायला.उज्वल भवितव्यासाठी.म्हणजे काय तर भरपूर अमेकिन डॉलर्स कमावून सुखी व समृद्ध जीवन जगण्यासाठी.त्यांच्या समाज व्यवस्थेनं, आईबापांनी व नातलगांनी हया मुलांना इंजिनियरिंग किंवा मेडिकल शिवाय इतर कशातही गोडी लागणार नाही याची पुरेपूर खबरदारी घेतलेली असते.मग मी त्यांच्याशी त्यांचा इतिहास, साहित्य, संगीत, संस्कृती, तत्वज्ञान यावर गप्पा मारतो.काही वाचायला सुचवतो.संगीत ऐकायला लावतो.लिंकस पाठवतो.त्यांनी आपल्या देशात परत जाऊन काम करायला पाहिजे हे अप्रत्यक्षपणे सुचवतो’.

मन्या बोलत असताना माझ्या डोळयांपुढं सारखी भारतातल्या मध्यमवर्गातली ‘घर घर की कहानी’ तरळत होती.मग न राहवून मी विचारलंच, ‘गडया पण तू कुठनं इतकी माहिती मिळवतोस? अन कशी’?

मन्या उत्तरला, ‘पब्लिक लायब्ररी.सार्वजनिक वाचनालयं रे.तुला सांगतो चांद्या, अमेरिकेतली मला आवडलेली ही सगळयात मस्त गोष्ट.मुक्त द्वार.उंची प्रासादातल्या अमेरिकेच्या अध्यक्षापासून ते रस्त्यावरच्या भणंग भिकारी इसमापर्यंत अगदी कुणालाही.सर्वांना

समान वागणूक. एका वेळी कितीही पुस्तकं न्या. अन एकदम फुकट. सगळा कर्मचारीवर्ग अगदी दोन्ही हात जोडून वाचकांच्या सेवेशी तत्पर. तेही सुहास्य वदनानं. आपली विद्यापीठातली जयकर लायब्ररी आठवते का? अन तिथले ते एरंडेल प्यायल्यासारख्या चेहे-याचे, पुस्तक मागणा-यालाच कानकोंडं करून सोडणारे नाठाळ कर्मचारी?. काही ठिकाणी तर छोटया स्टडीरूम्स व कॉफी हाउस पण आहेत. शिवाय कंम्प्युटर बूथस जागोजागी लागलेले. कुठचाही दंभ नाही की पोलिसगिरी नाही. वाटेल ते करू शकता. अगदी पोर्नोग्राफी सुध्दा पाहू शकता. कुणी हटकणार नाही. अनेकदा सोमवार ते शुकवार बारा पंधरा तास मी तिथं पडलेला असतो. शिवाय सोशल नेटवर्किंग आहेच ना. वेळ कमी पडतो रे'.

'मग एवढा आटापिटा करून काही फरक पडतो का तुझ्या चिनी सोन्यांच्या गोळयांत'?

'नाही रे. दहापैकी दोन तीन मुलांच्या मनोवृत्तीत हळूहळू फरक पडतो. पण बाकीच्या प्रवाहपतितांच्या निदान स्मृतीकोषांत तरी हे सगळं जाऊन बसतं ना. कधीतरी त्यांच्या कामी येईल अशी आशा करायची. अन मुख्य म्हणजे माझा स्वतःचा केवढा फायदा. आधी समजून घेण्यात व मग समजावून सांगण्यात. शेवटी मास्तरचाच मुलगा ना मी?'.

मी मान डोलावली व विचारलं, ‘पण आपल्या शत्रूराष्ट्राच्या पोरांचाच का एवढा पुळका’?

‘अरे. हिंदी चिनी भाई भाईची कहाणी आता जुनी झाली. रशिया तर आता संपल्यातच जमा आहे. आशियात चीनच काय तो अमेरिकेला शह देऊ शकतो. जागतिक राजकारणात कुणी एक देश अतिबलाढय असून चालत नाही. अमेरिका ताकदवान आहेच. चीन पण तसा होणं समतोलासाठी आवश्यक आहे. तो देश तसा होऊ शकतो. पण तिथली बुद्धिमान तरूणाई जर इथंच येऊन फसली तर? म्हणून माझा साधा प्रयत्न. संवादाचा’. मन्या.

‘अरे. पण लेका, असं छोटया फुटकळ गटांशी बोलून काय होणार? किती मोठया प्रमाणावर आशियाई तरूण अमेरिकेत येत आहेत? हे म्हणजे बोळयानं लोंढा अडवण्यासारखं नाही का?’ मी शंका विचारली.

‘आपल्याला पटलंय ना? मग आपला वाटा आपण उचलायचा. असं बघ. अगदी गांधी नेहरू अन बाबासाहेब आंबेडकर शिकायला परदेशात आले अन कुणीतरी त्यांच्याशी बोललं, ख-या ज्ञानमार्गावर नेलं तेव्हांच भारतात काही फरक पडला ना? नेतृत्व करणारी माणसं मूठभरच असतात. कुणी सांगावं माझ्या इथल्या विद्यार्थी मित्रातही

असा एखादा नसेल कशावरून. आपण आपला प्रयत्न करत रहायचं. कसलीही आशा न धरता' . मन्या म्हणाला.

जरा खवचटपणानंच मी विचारलं, 'मग, आपल्या "मेरा भारत महान" साठी काही उपक्रम'?

मन्या उत्तरला, 'आहेत तर. मी भारतातनं इथं आलेल्या मुलामुलींशी सुद्धा बोलतो. ऐकतात, हसतात अन टिंगलपण करतात पाठ फिरली की. माझी तयारी आहे तिकडच्या पण लोकांशी बोलण्याची. अगदी वेब कॅम वगैरे वापरून थेट भारतातल्या खेडयापाडयातल्या मुलांशी संवाद साधायला पण आवडेल. तसा प्रयत्न पण करून पाहिला एकदोनदा. पण प्रतिसाद शून्य. बघ तू परत गेलास की अन बोल चार लोकांशी. तुझ्या मुलाशीच बोलून सुरूवात कर बघू' . मन्या.

'बाप रे. मी इथं मुलगा, सून व नातवापुढं बसून "आ अब लौट चले" आळवतोय हया नुसत्या कल्पनेनं पण घाम फुटतोय बघ मला. अन तिकडं पुण्यातल्या नातवानं तर "भारत छोडो, अमेरिका चलो" हा नारा केव्हाचाच दिलेला आहे. अन काय रे, तू लोकांना एवढं ब्रम्हज्ञान सांगतोस तर तू इथं कसा? असं कुणी तुला विचारत नाहीत?'

'विचारतात ना. पण मी आलो तो पंचवीस वर्षांपूर्वीचा काळ वेगळा होता. मुंबईतल्या त्या जगप्रसिद्ध संस्थेत एका वर्षात दोन दोन गाईड झाले पी. एच. डी. करताना. पहिला ठार वेडा आहे हे समजायला

मला सहा महिने लागले. दुसरा विद्यार्थ्यांच्या कामावर सतत जगभर फिरणारा. निवृत्तीनंतरची सोय व्हावी म्हणून संस्था उभारणारा. नाना उचापती करून ठिकठिकाणचे हितसंबंध जपण्यातच धन्यता मानणारा. त्याच्याशी पंगा घेण्याची कोणाचीच शामत नव्हती. सहा महिन्यातून एकदाच जेमतेम अर्धा दिवस वाटयाला आला. मग मीच शेवटी बाहेर पडलो व अमेरिकेत व्हर्जिनियाला आलो. इथं सुद्धा 'दगडापेक्षा वीट मऊ' असा प्रकार पण निदान काम तरी मनासारखं झालं व पदवी पण पदरात पडली. पण तोवर पस्तीशी उलटून गेली होती'. मन्या म्हणाला.

तो धागा धरून मी विचारलं, 'तिकडं पूर्व किनारी थंडी अन बर्फ फार ना? अन तुझे हठयोगाचे उद्योग जोरात. त्याच प्रयोगांनी हिरो बनवलं ना तुला? पेपरात छबी अन टी. व्ही. वर मुलाखत. मॅगी सांगत होती मघाशी'.

'छे रे त्यासाठी नव्हतं केलं. वळवळला किडा डोक्यात अन लागलो धावायला बर्फात. उघडाबंब अन अनवाणी. हया यांकीना नवीन काही दिसलं की लागतात मागं. हां त्यातनं मला मैत्रीण मात्र मिळाली'.

मी उडालोच. 'काय? तुला अन मैत्रीण? तिकडं तर पोरींपासून चार हात लांबच पळायचास'.

‘हो. पण आकर्षण होतंच की. “बाकी सगळया तकारी अन गा-हाणी सहन करीन पण मुलींची व बायकांची खोडी काढशील तर गाठ माझ्याशी आहे” असं आईनं निक्षून सांगितलं होतं. घराबाहेर काढीन अशी धमकी पण दिलेली होती. पण माझा हया विषयातला अभ्यास व्यवस्थित चालू होता. अगदी कामशास्त्रावरचे संस्कृत ग्रंथ, तुम्ही जी मासिकं चोरून व लपवून वाचायचा ती मी राजरोसपणे घरात आणून वाचायचो. आईचा ओरडा सहन करून. मग रंभा, अप्सरा, मेनका, कामदेव, मदन कसे दिसत असतील हे आजूबाजूला बघायचो. सिनेमातल्या नट नटयांवरून थोडाफार अंदाज यायचा पण कितीही पाहिलं तरी ते दुरून दर्शनच ना शेवटी. शाळा कॉलेजमधल्या मुग्ध कलिका व रूपगर्विता एकतर आपल्याच नादात किंवा सदा बावरलेल्या व धास्तावलेल्या. आईबापांच्या कडक शिस्तीत व अनामिक दहशतीत. आसपास काही वेगळंच दिसायचं. अगदी दाणे आळीतल्या थोबाडं रंगवून बसलेल्या बाया ते रजनीश आश्रमातल्या फॉरीन बायांचे चाळे पण कोरेगाव पार्कला जाऊन बघून यायचो. वाडयातली व चाळीतली कुटुंबं, इथल्या रेस्टरूमपेक्षाही लहान जागेतली त्यांची खुराडयासारखी घरं, पोराबाळांनी ओसंडून वाहणारे संसार, कामवाल्या बायांचं झोपडपटटीतलं जगणं, त्यांचे दारूडे आयतोबा नवरे हे सगळं वेगळयाच पद्धतीनं बघायचा चाळाच लागला मला. हया स्त्री पुरूषांच्या जीवनात ‘सेक्स’चं नेमकं स्थान काय

असावं? संभोगातून मिळणारा अवर्णनीय आनंद ही काय चीज असते हयाची काही कल्पना तरी असेल का हयांना? कधी बोलत तरी असतील का एकमेकांशी हया विषयावर मोकळेपणी? मग रजनीशांचं 'संभोगातून समाधी' कडं नेणारं तत्वज्ञान तर दूरच. त्याचवेळी र.धों.कर्वे हयांच्या 'समाजस्वास्थ्य' चे अंक, श्री.ज.जोशी व य.दि.फडके हयांची रघुनाथराव कर्वे हयांच्यावरची पुस्तकं हे ही वाचनात होतंच. परदेशातला मोकळेपणा पण वाचनातून व फिल्म क्लबच्या माध्यमातनं आकळत होताच. अन मग एक दिवस "माझ्या जीवनात सेक्सचं स्थान काय" हा प्रश्ण मलाच पडला. पण तेव्हां विद्यार्जन चालू होतं अन त्याविषयी माझं काही मत बनायच्या अगोदर इकडं निघून आलो. अन उधळलोच. स्त्री पुरूषांच्यातलं अनिर्बंध व पराकोटीचं व्यक्तीस्वातंत्रय पाहून दिपून गेलो. मग हयातही मनसोक्त बागडून झालं. शिकत असताना मैत्रिणी ब-याच झाल्या पण सखी मात्र एकच मिळाली अन ते पण दोघंही मॅरेथॉन शर्यतीत धावत असताना'. मन्या

'अरे वाः फक्त सखीच की सहधर्मचारिणी पण? काय नाव काय तिचं?' न राहवल्यानं मी मन्याला मध्येच विचारलं.

'ज्यूली. माझ्यासारखीच बिनधास्त. तल्लख बुद्धीची व हुशार. आई वडील तिच्या बाळपणीच गेलेले. मावशीनं वाढवलं. विवाहसंस्था व पोरंबाळं हयात अडकून न पडणारी. तीनेक वर्ष एकत्र होतो

आम्ही . काही काळ विद्यापीठात शिकवलं मग पुढं गावातल्या कॉलेजात . वर्गात मी फक्त संकल्पना सांगायचो . बाकीचं सगळं पुस्तकात दिलेलं आहे . कुठं अडलात तर मी उपलब्ध आहे असं सांगायचो . वर्गातला उरलेला वेळ मग मी मुलांच्या मनाची मशागत करण्यात घालवायचो . कधी त्यांना बाहेर गिरीभ्रमणाला किंवा पक्षी निरीक्षणाला वगैरे घेऊन जायचो . काही विद्यार्थ्यांनी मग 'सर नीट शिकवत नाहीत, अनावश्यक गोष्टीतच फार वेळ वाया घालवतात' अश्या तकारी केल्या . परिणामी कॉलेज व्यवस्थापनानं हाकललं . तशी ज्यूली किरकोळ कामं करत होती . पण पुढं काय करायचा हा प्रश्णच होता . मनासारखंच वागायचं हा निश्चय हळूहळू पक्का होत होता . तशात ज्यूलीचे विचार अचानक पालटू लागले . स्त्री देहाच्या परिपूर्णतेसाठी व शरीरशास्त्राप्रमाणं तिनं गर्भवती होणं आवश्यक आहे असं तिच्या मनानं घेतलं . त्यासाठी आपण दोघांनी लग्न करू अशी भुणभुण तिनं सुरू केली . मला ते पटेना . बराच वाद झाला व शेवटी आपापल्या वाटेनं जायचं ठरलं . तिनं पुढं खरोखरीच एकाशी लग्न केलं व एका मुलाला जन्म दिला . दुर्दैवानं तिचा नवरा अपघातात गेला . मग सरोगसीचा मार्ग शोधून तिनं आणखी एकदा मातृत्वाची हौस फेडून घेतली . चार पैसे गाठीला बांधले व आता सोशल सिक्युरिटीचं काम करत मुलाला वाढवते आहे' . मन्या .

'बाप रे . अन मग तू इकडं पश्चिम किनारा कधी गाठलास'? मी .

‘आम्ही वेगळं झाल्यावर . काही दिवस किरकोळ कामं व उद्योग करून बघितले . ग्रीन कार्ड होतंच . घरात राहणं परवडेना . दोन गाडया होत्या . एक विकून टाकली . दुसरीतच मग संसार थाटला . जड गेलं सुरूवातीला पण मग अंगवळणी पडलं . पण थंडीत फारच त्रास व्हायला लागला . वय वाढत चाललेलं . हातपाय गार पडायचे . बोटं वाकडी व्हायची . कुणीतरी इकडं यायचा सल्ला दिला . बराच उबदार प्रदेश आहे . विद्येचं माहेरघर आहे . गावाचं नावच विद्यापीठाशी निगडित आहे . इथं तुमच्या मनासारखं काम करता येईल म्हणाले . मग तीन हजार मैल ड्राइव्ह करत इथं आलो . आता गेली आठ वर्षं इथंच आहे’ .

‘मग सुधारली का तब्येत इथं येऊन?’

‘काही दिवस बरे गेले . मग पुन्हा ये रे माझ्या मागल्या . दोन वर्षापूर्वी हालत फार खराब होती . स्नायू आखडायचे . हातापायांच्या हालचाली फार वेदनामय असायच्या . तरूणपणात शरीराशी फार मस्ती केली . आता त्याची भरपाई सुरू झाली . भारतात जाऊन आयुर्वेदिक, होमियोपथिक उपचार घ्यावेत असं काहीनी सुचवलं . पण परवडलं पाहिजे ना येणं जाणं . अन तिथं आता आहे तरी कोण? ज्यांना समजलं त्या मित्रांनी फोन करून यायची गळ घातली . सगळा खर्च करतो म्हणाले . पण मीच नकार दिला . काय व्हायचं ते आता इथंच’ .

‘मग? कशानं गुण आला शेवटी? आता बरा दिसतो आहेस’.

‘अरे शेवटी अचूक निदान अन उपचारच महत्वाचे ना. भेटला इथं एक इंडियन डॉक्टर. सगळं ऐकून घेतलंन. माझ्या शरीरावरच्या अघोरी प्रयोगांचे हे परिणाम म्हणाला. मांस मटण खात नाही. शरीराला आवश्यक जीवनसत्वं मिळत नाहीत. मी बदलणं शक्य नाही हे लक्षात आल्यावर त्यानं महिन्याला एक व्हिटॅमिनच्या इंजेक्शनसचा बूस्टर डोस चालू केला. त्याचा परिणाम दिसायला लागला. आता महिन्यातनं एकदा ॲडमिटच व्हायला लागतं हया उपचारासाठी. इथली सामाजिक वैद्यकीय सेवा मोफत व भन्नाटच आहे पण योग्य डॉक्टर मात्र मिळावा लागतो. तो मिळाला नशीबानं.’

गप्पांमध्ये वेळ कसा निघून जात होता ते कळतच नव्हतं. दोन वाजायला आले होते. पोटात भुकेची जाणीव व्हायला लागली होती. मन्याच्या ते लक्षात आलं. चल खाऊन घेऊ या काहीतरी म्हणाला. दोघं पुन्हा पदयात्रा करत अनेक गल्ल्या ओलांडत निघालो. वीसेक मिनिटांनी एका आडबाजूला निळया रंगाच्या जुनाट मोटारीपाशी मन्या थांबला. १९९१ ची टोयोटा आहे म्हणाला. पुढच्या सीटवर बसलो. दोघांनी सीट बेल्ट बांधले. बेल्टचं दुसरं मोकळं टोक गाडीच्या टपापासच्या हूकला अडकवलं. मन्यानं गाडी चालू केली. निघणार तोच त्याचा फोन वाजला. आवाज नीट येईना म्हणून तो दार उघडून बाहेर गेला. मी मागं नजर टाकली. मागच्या सीटवर

दोन मोठे खोके. एकातून कपडे डोकावत होते तर दुसऱ्यातून पुस्तकं व जुनी कागदपत्रं. खाली बाजूला एक जुना टू इन वन टेपरेकॉर्डर पडलेला होता. शेजारच्या लहान खोक्यात कॅसेट टेपस. एकीवरचं अक्षर जरा ओळखीचं दिसलं म्हणून हातात घेऊन बघितली तर ती मीच दिलेली निघाली. भीमसेनजींच्या 'जो भजे हरी को सदा' भजनाची. म्हणजे मन्या इथंही मोटारीतच राहतो की काय? ह्या विचारात असतानाच मन्या फोन आटोपून आत येऊन बसला.

माझ्या हातातली टेप पाहून म्हणाला, 'होय. तूच दिलेली टेप आहे. आता मशीन पण नीट चालत नाही. पण इतक्यांदा ऐकलीय की ते गाणं मनात सतत वाजत असतं. अगदी झोपेतही. गेली अनेक वर्षे ही गाडीच माझी सखी. ही सीट जरा मागे केली की माझा बेड तयार. दोन तीन तास झोप पुष्कळ होते. जाग आली की तीन चार तास व्यायाम. योगासनं व ध्यान धारणा. मग सार्वजनिक रेस्टरूममध्ये जाऊन देहधर्म. दिवसभर मन रमेल त्या उद्योगात. वीकएण्डला शहराबाहेर. मनात येईल तिथे. हा उपक्रम इथं आल्यापास्नं चालू आहे. अन त्यात रमलो आहे. हमखास उत्पन्न देईल असं काही काम नाही. सोशल सिक्युरिटीवर, सामाजिक सुरक्षा कार्डावर जगतो आहे. अमेरिकन नागरिकत्व अलिकडंच मिळवलंय. ज्युलीनं खूप मदत केली. आत्ता तिचाच फोन आला होता'. अतिशय शांतपणे मन्या सांगत होता.

मग म्हणाला, ‘अरे . मी माझीच कहाणी सांगत बसलो . चल आज तुला इथलं “वैशाली रेस्टॉरंट” दाखवतो’ .

वीसेक मिनिटं ड्राइव्ह केल्यावर गावात पोचलो . मग जिथं पार्किंग फुकट आहे तिथं दोन तासांसाठी गाडी उभी करून छोटयाशा जागेतल्या ‘उडुपी साऊथ इंडियन’ रेस्टॉरंटमध्ये शिरलो . तीन वाजायला आलेले होते . तुरळक गर्दी होती . वेटरनं दोन ग्लास पाणी व मेन्यू कार्ड आणून ठेवलं . मी कार्ड वाचत असताना मन्या म्हणाला,

‘इकडे तुला काय आता वाईन, बीयर किंवा व्हीस्की घ्यायची सवय झाली असेल जेवायच्या आधी . संकोच करू नको हं . इथं कुठं ढेरपोटया, उघडाबंब नित्यानंद स्वामींचा फोटो नाहीए हार घातलेला . मी काहीच घेत नाही पण तू काय पिणार बोल’ .

मी म्हणालो, ‘खरंच की . फोटो तेवढा बाकी आहे . बाकी एकदम उडुपी हॉटेलच दिसतंय मुंबई पुण्याकडचं . अगदी राईसप्लेट पण तशीच . पण अपेयपान मात्र नको हं . आपण आज खरंच वैशालीत बसलो आहोत असंच समजू . एक नरम मसाला डोसा अन तो खाल्ल्यावर मग कडक फिल्टर कॉफी . बास’ . मन्यानं स्वतःसाठी इडली व माझ्यासाठी मसाला डोसा मागवला .

पुन्हा आमच्या गप्पा सुरू झाल्या .

‘मन्या.खरंच अचाटच आहेस तू.पण तुझ्या या वेडातही एक कळकळ व बांधिलकी दिसते आहे मला.मग चार लोकांना बरोबर घेऊन संस्थात्मक रूप का देत नाहीस तुझ्या उपक्रमांना’?

‘तो ही विचार करून झाला माझा.म्हणजे मी माझा मठ उभारायचा.मग त्याच्या व्यवस्थापनातच सगळा वेळ निघून जाणार ना माझा.शिवाय पैसे देणार त्यांच्यापुढं तोंडं वेंगाडणं व त्यांना हवं तसंच काम करणं अन रिझल्ट देणं नाही जमणार मला.आपली गाजराची पुंगी.नाही वाजली तर मोडून खाल्ली.काडीचा खर्च नाही मला.ज्यांना पटतंय ते येतात शोधत मला.इथं दर सोमवारी आठ दहा तरूण तरूणी संस्कृत शिकायचा प्रयत्न करतात.इंडियातनं पुस्तकं वगैरे साहित्य मागवतात.संपूर्ण दोन तासात इतर कुठचीही भाषा कानावर पडत नाही.मला घेऊन जातात व शंका विचारतात.जीव रमतो त्यांच्यात.अशी बरीच आनंदाची बेटं आहेत आसपास.कधी फार पाऊस झाला, थंडी पडली तर मला शोधत येतात.मोठया प्रेमानं आपल्या घरी घेऊन जातात.हा मोबाईल फोन पण असाच एकानं दिला आहे.हेच माझे खरेखुरे सगेसोयरे’.

इडली डोसा आला.त्याच्या प्लेटमधली एक इडली मला आग्रहानं घ्यायला लावलीन.कडकडून भूक लागली असल्यानं माझं उदरभरण तर त्याचं यज्ञकर्म चालू होतं.माझं खाणं होऊन कॉफी येईपर्यंत तो एकच इडली अत्यंत आवडीनं आस्वाद घेत व सावकाश खात होता.

‘पण हे असं कुठवर चालायचं?’

‘जोवर हयात आनंद मिळतो आहे ना तोवर. मायबाप अमेरिकन सरकारच्या कृपेनं ‘सामाजिक सुरक्षितता व औषधोपचार’ मोफत होत राहतीलच. उपकाराच्या नव्हे तर कर्तव्याच्या भावनेतनं व प्रेमानं होतील. आज गाडीत आहे. उद्या गाडी विकून टाकायची वेळ आली तर मग मात्र खरोखरीचा अनिकेत. रस्त्यावरच. असे असंख्य भणंग बेघर अमेरिकेतल्या प्रत्येक छोटया मोठया शहरात आहेत. त्यातलाच मी एक. कदाचित मोठया शहरात जाईन. दोन फूट लांबी रूंदी व उंचीचं बोचकं घेऊन सार्वजनिक ठिकाणी वावरेन. कॉपनं पकडून नेलं तर तुरूंगातला पाहुणचार घेऊन येईन. पुढच्या वेळी भेटशील तेव्हां कदाचित इथं नसेनही. सॅन फ्रान्सिसकोच्या पब्लिक लायब्ररी बाहेरही दिसेन पडलेला. ज्ञानमार्ग मात्र होता होईतो सोडणार नाही. कुठून आलो व कुठं जाणार हयापेक्षा आत्ता काय करणार हे मला जास्त महत्वाचं वाटतं. मी मेल्यावर माझ्या बॉडीचं काय होणार हयाची काळजी मी कशाला करू?’

मी ऐकतच राहिलो. ताटातली इडली सांबर व चटणी मन लावून चाटून पुसून खाऊन झाल्यावर मन्या उठला. खिशातनं ब्रश व पेस्ट काढून हातात घेतलीन. बत्तीशी शेवटपर्यंत शाबूत ठेवायची असेल तर हे करावंच लागतं म्हणाला. ‘तू कॉफी घे. मी रेस्टरूमला जाऊन येतो पटकन’ असं सांगून गेलाही.

कॉफी घेतली . वेटरला बोलावलं . बिल मागवलं व वीस डॉलरची नोट त्याच्या हातात ठेवली .

'तुमच्याकडनं पैसे घ्यायचे नाहीत असं सांगून व क्रेडिट कार्ड माझ्यापाशी देऊनच साहेब रेस्टरूमला गेले आहेत' असं तो म्हणाला .

दहा मिनिटांनी मन्या बाहेर आला . आता परत निघायला हवं होतं . दीड तासांचा तरी प्रवास होता .

मन्यानं मेट्रो स्टेशनकडं गाडी घेतली . गाडीत बराच वेळ दोघंही गप्प गप्पच होतो . मग मीच म्हणालो, 'मन्या . आज तीस वर्षांनी तुला भेटून मला किती आनंद झालाय ते मी शब्दांत नाही सांगू शकणार . पण तुला आनंदी व समाधानी पाहून खूप बरं वाटलं . तुझ्या अनोख्या कामात माझ्या शुभेच्छा . कधी काही लागलं तर विनासंकोच सांग रे मित्रा' . डोळे भरून यायला लागल्यानं थांबलो .

पुढच्याच सिग्नलपाशी त्यानं गाडी रस्त्याच्या एका बाजूला घेतली . म्हणाला,'माझी अवस्थापण काहीशी तुझ्यासारखीच झाली आहे . इतक्या वर्षात 'मन्या' म्हणून कोणीच हाक मारायला आलं नाही रे . वाटेल तशी मोडतोड करायचे माझ्या नावाची . पण मी कधी बोलायचो नाही . फार लाडात आली म्हणजे ज्यूली कधी कधी 'माय डियर मॅन-ओ-हार' म्हणायची . आजचा दिवस मी जपून ठेवेन चांद्या . आपल्या सगळया दोस्तांना माझा नमस्कार सांग . मी विसरलेलो

नाहीए कुणालाही. हा रस्ता ओलांडलास की खाली उतरून जा. मेट्रो स्टेशनातच जातो तो. काही अडलं तर फोन कर. तुझा फोन आला नाही म्हणजे नीट पोचलास असं समजेन मी. मेलवर रहा. अन मुख्य म्हणजे भास्करबुवा व अलादियाखानची ध्वनिमुद्रणं तेवढी पाठव मेलवर. विसरू नकोस हां. मी वाट पाहतोय'.

मन्याच्या गाडीतून खाली उतरलो. त्याच्या डोळयांच्या कडा किंचित पाणावल्यासारख्या वाटल्या. पण पुढच्याच क्षणी 'हा चॅप्टर संपला' असा काहीसा भाव डोळयांतल्या घाऱ्या बाहुल्यांत तरळायला लागला. गाडी सुरू करून 'बाय' म्हणून वेगानं निघूनही गेला. निळया रंगाची त्याची जपानी 'सखी' टोयाटो नजरेआड होईतो मी पहातच राहिलो. अभावितपणे हात खांद्यावरच्या झोळीत गेला. त्याच्या साठी घेतलेला लाल चेरीच्या फळांचा पुडा पिशवीतच राहून गेला होता.

यांत्रिकपणानं पण काळजीपूर्वक रस्ता ओलांडून मेट्रो स्टेशनात शिरलो. गाडी घराकडं वेगात धावू लागली. मन मात्र मन्याभोवतीच घुटमळत होतं. खिशातला मोबाईल काढला. कानात हेडफोनच्या गुंडया घालून व डोळे बंद करून साठवून ठेवलेली शेकडो गाणी एकामागून एक ऐकायला सुरूवात केली. पहिलंच गाणं सुरू झालं 'जो भजे हरीको सदा, सोही परम पद पाव गा'. गालांवरून अश्रू ओघळू लागले. मुलगा स्टेशनबाहेर येऊन थांबला होताच. अवाक्षरही न बोलता गाडीत जाऊन बसलो. घरी आलो. डिनर नको सांगून माझ्या

खोलीत जाऊन बसलो. काहीच सुचत नव्हतं. माझं काहीतरी बिनसलंय हे ओळखून जेवायच्या वेळी पुन्हा खोलीत डोकावलेला मुलगा खाली निघून गेला.

सकाळी जरा सावरलो. ब्रेकफास्टच्या वेळी आमच्या अनोख्या भेटीची हकीकत सांगितली. सगळयांनाच नवल वाटलं. मग नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणं लॅपटॉपवर लॉग इन झालो. काल काढलेले फोटो व व्हिडियो अपलोड केले. मन्यासकट सर्व मित्रांना पाठवले. दहा मिनिटात पुतणी चॅट रूमवर अवतरली. तिच्या प्रो. रानडे काकांना पाहून व ऐकून खुष झाली होती. आणखी एका रानडे सरांची लिंक पाठवली आहे म्हणाली. उत्सुकतेनं ती उघडली. पुण्याच्या 'विशाल सहयाद्री' मासिकाच्या दिवाळी अंकातला एक खूप जुना लेख कुणीतरी स्कॅन करून पाठविला होता. लेखाचं शीर्षक होतं 'आमचे रानडे सर'. १९५० च्या आसपासचा लेख होता तो. कुणा विद्यार्थ्यानं शाळेतल्या गणिताच्या शिक्षकांवर दीर्घ लेख लिहिला होता.

'आमचं भाग्य असं थोर की ज्या रानडे सरांचं गणिताचं पुस्तक आम्हाला अभ्यासाला नेमलेलं होतं तेच आम्हाला शिकवायला पण होते. गणित शिकवण्यात त्यांचा हातखंडा होताच पण मुख्य म्हणजे त्यांनी आम्हाला विचार करायला शिकवलं. कितीतरी विषयांचा परिचय आम्हाला त्यांच्यामुळं झाला. जीवनाला उपयोगी पडेल ते सगळं शिक्षण शाळेत मिळालं पाहिजे असा त्यांचा आग्रह असे. त्यांच्या

पुढाकारानंच बागकाम, शिल्पकला, मुलांचं स्वयंपाकघर असे उपक्रम रविवारी शाळेत होत असत. इतर शिक्षकांच्या टिंगल टवाळीकडं ते लक्ष देत नसत. मोठया सुटीच्या दिवसांत ते आम्हाला निसर्गात घेऊन जात. पानाफुलांचा व पशुपक्षांचा परिचय करून देत. दगड धोंडयातलं सौंदर्य पहायला शिकवत. अनेकदा त्यांचा मुलगा मनोहर त्यांच्याबरोबर असे. पुढं काय झालं कळलं नाही पण अचानक सर शाळेत यायचे थांबले. काही पालकांनी तक्रार केल्यानं शाळा व्यवस्थापनानं त्यांना काढून टाकलं असं काही मुलं बोलत. त्यानंतर ते कुणालाच फारसे दिसले नाहीत. निराश मनानं ते घर सोडून निघून गेले असंही कानावर येई. पण सरांनी बांधून दिलेली अनमोल शिदोरी आयुष्यभर पुरून पुन्हा उरतेच आहे’. वाचता वाचता डोळे भरून येऊ लागले. स्क्रीन वरची अक्षरं पुसट व अस्पष्ट दिसायला लागली.

सुरेश चांदवणकर

१५ जुलै २०१३